# वृक्षमित्र धों. म. मोहिते

श्री. धों. म. मोहिते, सामान्यातील असामान्य !!! त्यांनी माहे एप्रिल 1970 ते 1981 या अकरा वर्षात पूर्ण वेळ देऊन, विनावेतन, विनाहुददा एक छंद, निसर्गवेड म्हणून अनंत अडचणींना तोंड देऊन, स्वतः पुढाकार घेऊन मोठया हिमतीनं सागरेश्वर अभयारण्याचा प्रकल्प उभा केला व त्या परिसरात लक्षावधी झाडे लावली. सागरेश्वर या उजाड माळावर नंदनवन फुलविले. पाऊस कमी, परिस्थिती प्रतिकुल तरीही त्यांनी खटपट करुन कमी पावसावर जगतील अशी झाडे लाऊन त्यांचे संगोपन, संवर्धन केले आणि सागरेश्वर हे एक रमणीय ठिकाण बनविले. जे पर्यटकांमध्ये अत्यंत लोकप्रिय ठिकाण बनले. त्यांनी आपल्या आडवळणी आणि उजाड गावांसाठी सरपंच म्हणूनही काम केले आणि गावाचा सर्वांगीण कायापालट केला. सागरेश्वर अभयारण्य निर्माण करणारे वृक्षमित्र, रानकवी धोंडीराम महादेव मोहिते यांचा परिचय -

- धोंडीराम महादेव मोहिते
- रा. **जिद्द निवास**, मु. पो. मोहित्यांचे वडगांव, ता. खानापूर, जि. सांगली
- जन्म दिनांक 25 जुलै, 1927
- व्यवसाय शेती
- मराठी सातवी पास, इंग्रजी तिसरी उत्तीर्ण
- वारकरी सांप्रदायिक शेतकरी घराणे
- भजन, सूरपेटी, तबला, पखवाज वादयात प्रविण
- 10 वर्षे किर्तनकार म्हणून वारकरी सांप्रदायिक किर्तने केली.
- आवड - लेझीम, आटयापाटया, आणि पोहणे तसेच छायाचित्रे, मोटारड्रायव्हींग यात प्रविण
- जागतिक किर्तीची किलोस्कर मासिके ऐन उमेदीत असतांना सन 1951 ते 1974 या कालावधीत कथा, मुलाखती इ. विपुल लेखन केले. **सोनहि-याचे पाणी कथा संग्रह,**
- **मुलाखतींच्या मैदानातून** कथारुप मुलाखती ही दोन पुस्तके, इतर नियतकालिकातून लेखन,
- सांगली आकाशवाणी केंद्रावरुन श्रुतिका भाषणे, लोकनाटय वगैरे प्रसारित.
- त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून 1 मे 1981 रोजी महाराष्ट्र शासनाने **वृक्षमित्र** म्हणून पदवी दिली.